**कार्यालय पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, जालना**
**टोल फ्री क्रमांक - 1064**
**कार्यालय दुरध्वनी क्र :- 02482-220252**

**:: प्रेस नोट ::** दिनांक :- 23.03.2021.

**अपर तहसिलदार, औरंगाबाद श्री. किशोर देशमुख यांना पोलीसांनी पकडलेल्या वाळुच्या रॉयल्टीच्या पावत्या ख-या आहेत कि खोटया याबाबतचा अहवाल देण्यासाठी 1,50,000/- रुपयांची लाच घेतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालनाच्या पथकाने पकडले.**

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | आरोपीचे नाव, हुद्दा व पत्ता | :- | लोकसेवक श्री. किशोर अवचितराव देशमुख, वय 50 वर्ष व्यवसाय नोकरी, अपर तहसिलदार, औरंगाबाद ह मु ए-3 प्राईड पार्क, वेदांतनगर औरंगाबाद मुळ रा. देऊळगाव बंडा ता.रिसोड जि.वाशिम (वर्ग - 1) |
| 2 | गुन्हा घडला तारीख व ठिकाण | :- | दिनांक 22.03.2021 रोजी एमटीडीसी रेस्ट हाऊस समोरील क्रांती चौककडे जाणारे रोडवर, औरंगाबाद येथे |
| 3 | लाचेची रक्कम | :- | 1,50,000/- रुपये. |

याबाबत हकीगत अशी की, यातील तक्रारदार वाळु वाहतुकदार असुन त्यांनी शासनाचे अधिकृत वाळुचे शेदुंरवाडा येथील खाम नदीचे घेतलेले आहे. त्यांचे वाळु वाहतुकीचे दोन हायवा एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पोलीसांनी पकडलेले असुन त्या हायवामधील वाळुचे रॉयल्टीचे पावत्या ख-या आहेत कि, खोटया आहेत याबाबत अपर तहसिलदार, औरंगाबाद यांना अहवाल मिळणेसाठी पत्रव्यवहार केला होता, त्यावरुन तक्रारदार यांचे हायवामधील वाळुचे रॉयल्टीचे पावत्या ख-या आहेत, असा अहवाल पोलीसांना देण्यासाठी 3,20,000/- रुपये तसेच इतर सहा हायवा वाळु वाहतुकीसाठी चालु देण्यासाठी 1,50,000/- रुपये माहेवारी हप्ता म्हणुन अपर तहसीलदार श्री. किशोर देशमुख यांनी तक्रारदार यांना लाचेची मागणी केली. सदर कामासाठी तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना येथे संपर्क साधून तक्रार दिली.

सदर तक्रारीवरुन दिनांक 10.03.2021 रोजी लाचेची पडताळणी केली असता अपर तहसिलदार श्री. किशोर देशमुख यांनी पोलीसांनी पकडलेल्या हायवामधील वाळुचे रॉयल्टीचे पावत्या ख-या आहेत, असा अहवाल पोलीसांना देण्यासाठी 3,20,000/- रुपये तसेच इतर सहा हायवा वाळु वाहतुकीसाठी चालु देण्यासाठी माहेवारी हप्ता म्हणुन 1,50,000/- रुपये लाचेची मागणी तक्रारदार यांचेकडे केल्याचे निष्पण्ण झाले होते, त्यावरुन दिनांक 22.03.2021 रोजी अपर तहसिलदार श्री. किशोर देशमुख यांनी पोलीसांनी पकडलेल्या हायवामधील वाळुचे रॉयल्टीचे पावत्या ख-या आहेत, असा तक्रारदार यांचे बाजुने अहवाल पोलीसांना देण्यासाठी तसेच सहा हायवा वाळु वाहतुकीसाठी चालु देण्याचा माहेवारी हप्ता म्हणुन तक्रारदार यांचेकडुन 1,50,000/- रुपये लाचेची रक्कम स्वत: पंचासमक्ष स्वीकारली असतांना त्यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालना पथकाने एमटीडीसी रेस्ट हाऊस समोरील क्रांती चौककडे जाणारे रोडवर, औरंगाबाद येथे रंगेहाथ पकडण्यात आले.

लोकसेवक श्री. किशोर अवचितराव देशमुख, वय 50 वर्ष व्यवसाय नोकरी, अपर तहसिलदार, औरंगाबाद ह मु ए-3 प्राईड पार्क, वेदांतनगर औरंगाबाद मुळ रा. देऊळगाव बंडा ता.रिसोड जि.वाशिम (वर्ग - 1) यांचे विरुध्द गुन्हा दाखल करण्याबाबत पुढील कार्यवाही चालु आहे.

**तसेच ॲन्टी करप्शन ब्युरो कडुन आवाहन करण्यात येते की, कोणी लोकसेवक शासकीय कामासाठी लाचेची मागणी करीत असल्यास किंवा खाजगी व्यक्ती मार्फत कोणी लाचेची मागणी करीत असल्यास 02482-220252, तसेच टोल फ्री क्रमांक 1064 वर संपर्क करावा. तसेच पोलीस उप अधिक्षक जालना मो.नं. 8975762906, पोलीस निरीक्षक मो.नं. 8390757835, 9823216788 वर संपर्क करावा.**

पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,जालना.